चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

१८ ऑगस्ट, २०१९

☎ : 07172-264300

: 07172-255800

p.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍ : 7276494810 (PRO)

# रूग्णवाहीकेत दारू तस्करी करणाऱ्याविरूध्द रामनगर पोलीसांची कार्यवाही

## ०१ आरोपींसह १६ लक्ष ८५ हजाराचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक १७/०८/२०१९ रोजी पोलीस स्टेशन रामनगर येथील येथील पोलीस पथकास गोपनयी माहिती मिळाली की, काही इसम यवतमाळ वणी वरून चंद्रपुर कडे एका १०८ रूग्णवाहीका(108 Ambulance) ज्यामध्ये अपघात आणि तात्काळ उपचाराकरीता रूग्णांची ने—आण केली जाते. अशा वाहनामध्ये अवैध रित्या दारू वाहतुक करीत आहे. अशा माहितीवरून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात रामनगर पोलीसांनी बंगाली कॅम्प ते बाबुपेठ बायपास रोडवर सापळा रचुन १०८ रूग्णवाहीकेस थाबंविले असता पोलीसांना पाहुण दोन इसम वाहनातुन पळुन गेले आणि वाहनचालक वाहनातच मिळुन आला. चालकास विचारपुस करून संशयावरून वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये मोठया प्रमाणात अवैध दारूचा साठा मिळुन आला. यावरून वाहन चालक आरोपी नामे राहुल विजय वानखेडे वय ३३ रा. चिमनाबागापुर, ता. बाभुळगाव जि. यवतमाळ यास अटक करून वाहनातुन ४८ पेटया देशी दारू किं. ४,७०,०००/—रू, ८ पेटया विदेशी दारू किं. १,१५,२००/—रू, १० पेटया ऑफीसर चॉईस कपंनीची विदेशी दारू किं. १,००,०००/—रू आणि एक रूग्णवाहीका क्र. एम एच १४ सीएल ०८९१ किं. १०,००,०००/—रू असा एकुण १६,८५,२००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास रामनगर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही श्री. डॉ. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर श्री. शिलवंत नांदेळकर यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन रामनगर प्रभारी पोनि. श्री. हाके यांचे नेतृत्वात, सपोनि. श्री. दरेकर, पोउपनि श्री. संदीप कापडे, सफौ प्रभुदास माहुलीकर, पोहवा आनंद परचाके, पोहवा रजनिकांत, पोना. शंकर येरमे, पोशि माजीद पठाण, मपोशि भावना रामटेके यांनी पार पाडली.

———————————————————————————————————